नि. फौ. ख. क्र.१३२/२०१५ निशाणी ८४

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.५ यांचा शपथेवर जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – रविंद्र देविसिंग कावल

वय – ६० वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त, सहा पोलीस उपनिरीक्षक

पत्ता – रा. अनिकट, अकोला, ता. जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्री. ए. ओ. गाडेकर यांचेमार्फत सरतपास सुरुः**

१. मी बाळापूर पो.स्टे. येथे सन २०१३ ते २०१८ या कालावधीमध्ये पोहेकॉ म्हणून कार्यरत होतो. अप क्र.११८/२०१४, भादंवि कलम ३२४, ५०४, ५०६ सह ३४ या गुन्ह्याचा तपास माझ्याकडे वरीष्ठांच्या आदेशाने वर्ग करण्यात आला होता. सदर तपासकामी मला फिर्यादीची एफआयआर व जबाब इ. कागदपत्र देण्यात आले होते. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, सदर गुन्ह्यातील फिर्यादी यास दि.२१.०६.२०१४ रोजी आरोपी क्र.१ ते ४ यांनी फायटरने व लोखंडी पाईपने तसेच थापडाबुक्कांनी मारुन जखमी केले होते.

२. दि.२१.०६.२०१४ रोजी मी सदर घटनास्थळी व्याळा येथे दोन पंचासमक्ष जावून घटनास्थळ पंचनामा केला. सदर घटनास्थळ फिर्यादी यांनी आम्हाला दाखविले. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर दोन पंचासह माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.८५** देण्यात येत आहे.

३. त्यानंतर सदर गुन्ह्यातील साक्षीदार यांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंद करुन घेतले. त्यानंतर सदर गुन्ह्यातील आरोपी क्र.१ ते ४ यांना अटक केली. आता मला त्यांचे अटक फॉर्म दाखविण्यात आले, त्यावर माझी, आरोपी व पंचांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **नि.क्र.८६ ते ८९** देण्यात येत आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी नामे शे. अतिक व आरोपी क्र.२ यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेले लोखंडी फायटर व लोखंडी पाईप दोन पंचासमक्ष जप्त केले व त्याचे २ पंचनामे तयार केले. आता मला जप्ती पंचनामे दाखविण्यात आले त्यावर दोन पंचासह, आरोपी व माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.९० व ९१** देण्यात येत आहे. सदर जप्त केलेला फायटर व लोखंडी पाईप मला दाखविल्यास मी ओळखू शकतो.

आता न्यायालयासमोर आर्टीकल अ व ब कडील लोखंडी फायटर व लोखंडी पाईप दाखविण्यात आला, तो तोच आहे.

४. त्यानंतर दि.०४.०७.२०१४ रोजीचे माझ्या सहीचे वैद्यकीय अधिकारी सर्वोपचार रुग्णालय, अकोला यांना फिर्यादी याचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरीता पत्र दिले होते. आता मला सदरचे वैद्यकीय प्रमाणपत्र दाखविण्यात आले, त्यावर स्वीकारल्याबाबतची हॉस्पीटलची सही आहे तसेच त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.९२** देण्यात येत आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने मी फिर्यादी वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले. आता मला सदरचे वैद्यकीय प्रमाणपत्र दाखविण्यात आले ते तेच आहे.

५. मी गजानन महादेव अंजनकार याचा जबाब नोंद केला होता. आता मला त्यांच्या जबाबातील अधोरेखांकित भाग अ वाचून दाखविण्यात आला तो त्याच्या सांगण्याप्रमाणे मी नोंद केला होता. सदर तपासामध्ये आरोपी क्र.१ ते ४ यांच्या विरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्यांच्या विरुध्द न्यायालयामध्ये दोषारोप पत्र दाखल केले. मी आरोपी क्र.१ ते ४ पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी क्र.१ व ४ न्यायालयात हजर असल्याबाबत साक्षीदार यांनी ओळखले. आरोपी क्र.२ व ३ आज न्यायालयात उपस्थित नाहीत, त्याच्या ओळखीविषयी कोणताही वाद उपस्थीत नाही.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ईरशाद खान यांचे मार्फत उलटतपासः</u>**

६. हे म्हणणे खरे आहे की, व्याळा ते बाळापूर पो.स्टे. यातील अंतर १० ते १२ किमी आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरची घटना ही दि.११.०६.२०१४ रोजी घडलेली होती व त्याची फिर्याद दि.२१.०६.२०१४ रोजी देण्यात आलेली होती. सन २०१४ मध्ये व्याळा गावामध्ये सरकारी दवाखाना अस्तित्वात होता. हे म्हणणे खरे आहे की, अकोला येथील सरकारी दवाखान्याच्या बाजूला एक पोलीस चौकी आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी याने शे. बबलू शे. सलीम, शे. कलीम शे. अलीम, शे. अजीम शे. सलीम व शे. अतिक शे. युसुफ या चार लोकांच्या विरुध्द फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, शे. बबलू शे. सलीम याच्या विरुध्द मी दोषारोप पत्र दाखल केलेले नाही. शे. इरफान उर्फ शे. बबलू शे. सलीम याच्या नावाचे कोणतेही ओळखपत्र अथवा कागदपत्र मी सदर दोषारोप पत्र सोबत

दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादमध्ये फिर्यादीने सांगितले आहे की, अतिक शेख याने फिर्यादीस फायटरने मारले आहे, परंतु सदर फिर्यादमध्ये शे. अलीम याने फिर्यादीस पाईपने मारले याबाबत कोठेही नमुद केलेले नाही.

७. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या अवतीभोवती लोकांची घरे होती. मी घटनास्थळाच्या आजूबाजूच्या लोकांची चौकशी केली नाही व त्यांची बयाणे नोंदविले नाहीत. मी जगतपाल वानखडे यांचा जबाब नोंद करुन घेतला होता. आता मला जगतपाल वानखडे याचा जबाबातील अधोरेखांकित भाग अ दाखविण्यात आला. त्यामध्ये खाडाखोड केल्याचे दिसून येते.

८. घटनास्थळ व जप्ती पंचनामा करण्याकरीता मी पंचांना कोणतीही नोटीस दिली नव्हती. राजेश वानखडे याचा जबाब मी नोंद केलेला होता. सदर दोषारोप पत्रात मी आरोपी क्र.२ यास शे. इरफान उर्फ बबलू असे नमुद केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दोषारोप पत्रामध्ये शे. कलीम शे. सलीम याचे नाव नमुद केलेले नाही. फिर्यादी विरुध्द गुन्हे असल्याबाबतची एफआयआर मी दाखल केलेली आहे अथवा नाही, हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी हा हॉटेल व्यावसायीक होता. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी याचा भाऊ हॉटेल व्यावसायीक होता तसेच आरोपी देखील हॉटेल व्यवसाय करतात.

९. मी साक्षीदार जगतपाल वानखडे याचा जबाब नोंद केला होता, त्यानी त्याच्या जबाबात त्या दिवशी माझा भाऊ मला असे म्हणाला की, हॉटेलवर काम आहे तु घरी जावून ये, हा मजकूर सांगितला नव्हता. तसेच त्यावेळी मी सर्व आरोपींना असे म्हणालो की, माझा काय कसूर आहे, तुमच्या वडीलांना विचारा की, मी त्यांना काही बोललो आहे का, तसेच त्यानंतर आरोपी क्र.२ शे. बबलू ने माझ्या गाडीची चावी काढून घेतली त्यामुळे मी चालत घरी गेलो तसेच माझ्या गाडीची चाबी शे. अतिक ने काढून घेतली होती, त्यामुळे तो माझी गाडी माझ्या घरी येताना घेवून आला होता व माझ्याच गाडीवर बसून शे. सलीमच्या घराच्या गल्लीमध्ये घेवून गेला तसेच त्यावेळी शे. अतिकने माझ्या गाडीला लाथ मारुन गाडी माझ्या अंगावर पाडली त्यामुळे माझा पाय गाडीच्या सायलन्सरखाली चेंदला, त्यामुळे माझ्या पायाला चटका लागला तसेच शे. अतिकने गाडीला लाथ मारली, तसेच शे. वसीम व शे. बबलू हे दोघे शे. अलीम व शे. अजीम ला म्हणाले की, मार डालो इसको, त्याचप्रमाणे अलीमने मला पाईपने मारहाण करीत असताना मी डावा हात मध्ये घातल्यामुळे माझ्या डाव्या हाताला पाईप

लागल्यामुळे पंजा फ्रॅक्चर झाला, तसेच शे. अजीमने मला रॉड मारला तसेच त्यांनी माझ्या गाडीची तोडफोड केली, गाडी माझ्या अंगावर पडली असल्यामुळे मला उठता आले नाही, तसेच मला मारहाण झाल्यामुळे मी बेशुध्द अवस्थेत पडलो होतो, मी अकोला येथील सरकारी दवाखान्यातमध्ये भरती होतो, त्या ठिकाणी मला शुध्द नव्हती त्यानंतर मला नागपुर येथील दवाखान्यात घेवून गेले होते, त्या ठिकाणी मी शुध्दीमध्ये नव्हतो, नागपूरला नेमके मला कोणत्या दवाखान्यात नेले होते हे मला माहित नाही, परंतु सरकारी दवाखान्यात नेले असावे, त्याचप्रमाणे ४ – ५ दिवसानंतर मला हॉस्पीटलमधून सुट्टी झाल्यानंतर घरी आलो, हा मजकूर सांगितला नव्हता.

१०. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र नागपूर येथील हॉस्पीटलमधून प्राप्त केली नाहीत. आर्टीकल ब कडील पाईप हा भंगारमध्ये सहज मिळतो. सदर गुन्ह्याची फिर्याद मी वैद्यकीय प्रमाणपत्र मिळण्यापुर्वी नोंदविली आहे. आर्टीकल अ कडील फायटर कोठून आणला याबाबत मी चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडून कोणतीही जप्ती करण्यात आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, गजानन अंजनकार यांच्या सांगण्याप्रमाणे मी त्यांचा जबाब नोंद केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीसोबत फिर्यादी याची व्यावसायीक दुश्मनी असल्याकारणाने फिर्यादीने आरोपीची खोटी फिर्याद दिली व त्याचा चुकीचा तपास करुन मी चुकीचे दोषारोप पत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, शे. वसीम याचे सदर दोषारोप पत्रामध्ये दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, शे. इरफान शे. सलीम, शे. अलीम शे. सलीम यांना खोट्या आरोपाखाली दोषारोप पत्र मध्ये सामील केले आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– १९.१२.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.12.19 14:55:22 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | १९/१२/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | १९/१२/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | १९/१२/२०२५ |